TWJ Foundation

# THE SOCIAL REFORMS

THE SOCIAL REFORMS

# प्रस्तावना

समाज म्हणजे दुसरं तिसरं काय? तुम्ही आणि आम्ही मिळून बनलेला एक समूह, जो नैसर्गिक साधनसंपत्तीवर आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे परस्परांवर अवलंबून आहे. हेच कारण आहे की प्रत्येक माणसाला स्वभावतः थोड्याफार प्रमाणात का होईना समाजभान असतं. त्यामुळेच समाजामध्ये असणारा विरोधाभास, सामाजिक समस्या यांच्याकडे सर्वांचंच लक्ष वेधलं जातं. हेच समाजभान आपल्याला दुर्बल घटकांना सहकार्य करायला किंवा समाजहितासाठी सातत्याने कार्यरत रहायला प्रवृत्त करत असतं. स्वयंसेवी संस्था या अशाच जागरूकतेचं प्रतीक म्हणता येतील.

TWJ फाऊंडेशन - द सोशल रिफॉर्म्स हा अशाच काही व्यक्तींचा एक समूह आहे, जो आपल्या कार्यातून सामाजिक बांधिलकी जपण्याच्या प्रयत्नात आहे. ३ जानेवारी २०२१ रोजी जन्मास आलेल्या या संस्थेचं कार्य हळूहळू वाढत जात आहे. बाळ जन्माला आल्यापासून त्याच्या वाढीचा प्रत्येक टप्पा कौतुकाने, अगदी डोळे भरून पाहताना आईला-वडिलांना जो आनंद मिळत असतो तोच आनंद संस्थेत काम करणारी प्रत्येक व्यक्ती आज अनुभवत आहे. आमची संस्था आता विविध सामाजिक क्षेत्रात आपलं तान्हुलं पाऊल रोवत पुढे वाटचाल करतानाचा हा प्रवास तुमच्यासमोर मांडत आहोत.

# TWJ फाऊंडेशन - द सोशल रिफॉर्म्स

कोणत्याही सामाजिक संस्थेच्या उभारणीसाठी आणि यशासाठी संस्थेच्या तत्वांचा, उद्देशांचा पाया मजबूत असणं अत्यंत आवश्यक असतं . केवळ सामाजिक बांधिलकी, संवेदनशील मन या गोष्टी असणं हे सामाजिक समस्या सोडवण्यासाठी पुरेशा ठरत नाहीत. खऱ्या अर्थाने समाज नव्याने घडवायचा असेल तर त्यासाठी समस्या ओळखून दुरदृष्टीने त्या सोडवण्यासाठी पावलं उचलणं, समान विचारसरणी असलेल्या लोकांना सोबत जोडून एक गाभा निर्माण करून योग्य कार्यप्रणाली द्वारे संस्थेचा प्रत्येक विभाग उभारणं हे महत्वाचं ठरतं. TWJ फाऊंडेशन - द सोशल रिफॉर्म्सचे संस्थापक श्री. समीर नार्वेकर आणि सौ. नेहा नार्वेकर यांच्या मार्गदर्शनामुळेच संस्थेच्या पायभरणीचे अवघड काम सोपे झाले. संस्थापकांबरोबरच संचालक श्री. प्रसन्न करंदीकर आणि श्री. महान कोरगावकर यांची समाजातील सर्व घटकांप्रती असलेली आस्था आणि सामाजिक समस्या सोडवण्यासाठी लागणारा व्यापक दृष्टिकोन याद्वारे संस्थेची तत्व आणि उद्देश निश्चिती करण्यात आली.



**श्री. समीर नार्वेकर**
संस्थापक



**सौ. नेहा नार्वेकर**
संस्थापक



**श्री. प्रसन्न करंदीकर**
संचालक



**श्री. महान कोरगावकर**
संचालक

संपूर्ण जगावर ओढवलेल्या कोरोनाच्या संकटकाळात जनजागृती तसेच आरोग्यविषयक सोयी सुविधांची निकड लक्षात घेता सर्वप्रथम TWJ - द सोशल रिफॉर्म्सचा आरोग्य विभाग सामाजिक कार्यात सक्रिय झाला. त्यानंतर कोरोनाची परिस्थिती जसजशी आटोक्यात येत गेली तसतसे संस्थेचे इतर क्षेत्रातील काम सुरु झाले. हळूहळू क्रीडा विभागामार्फत ग्रामीण खेळाडूंना क्रिकेटच्या सुयोग्य मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. सामाजिक समस्यांच्या समूळ उच्चाटनाच्या हेतूने त्या प्रश्नांवर संशोधनाचे कार्य संस्थेत सुरु झाले. ३ जानेवारी २०२१ रोजी संस्थेच्या स्वतंत्र कार्यालयाची स्थापना झाली. तेव्हापासूनच विविध स्तरावर कार्यरत असलेल्या संस्थेला स्वतंत्र अशी ओळख प्राप्त झाली.

प्रामाणिक उद्देशासह आणि तेवढ्याच जिद्दीने कोणतेही कार्य हाती घेतल्यास ते कार्य तडीस नेण्यासाठी अत्यंत आवश्यक असणारी तज्ञ माणसे आपोआप त्या कार्याशी जोडली जातात, याचा प्रत्यय संस्थेला वेळोवेळी येत गेला. जसजशी सामाजिक कार्यात रस असलेली, त्या त्या क्षेत्रातील तज्ञ मंडळी संस्थेशी जोडली जाऊ लागली तसतसा संस्थेचा कार्यविस्तार अधिक वेगाने होऊ लागला. संस्थेशी जोडल्या गेलेल्या या सक्रिय हातांमुळे ३० जुलै २०२२ पर्यंत म्हणजेच अवघ्या दिड वर्षाच्या कालावधीत एकूण १८० हून अधिक समाजोपयोगी उपक्रम संस्थेमार्फत राबविण्यात आले. या विविध उपक्रमांचा सुमारे ३६००० लोकांना लाभ मिळाला.

TWJ फाऊंडेशन - द सोशल रिफॉर्म्सचे विविध विभाग –

१. क्रिडा : क्रिकेट व तिरंदाजी
२. आरोग्य
३. संशोधन (The Incubation Centre)
४. शिक्षण
५. नाट्य
६. कलाआरंभ
७. कृषी
८. भावार्थ
९. देवराई
१०. नृत्य (Just Moves)
११. जनसंपर्क
१२. पाणी व्यवस्थापन
१३. मानसिक रूग्ण सेवा



**श्री. रविदास कांबळे**
कार्यवाह



**श्री. कमलेश कळसुलकर**
क्रिएटिव्ह हेड

# क्रीडा

क्रीडा क्षेत्रात पदार्पण करून आपल्या भागाचं, राज्याचं, आपल्या देशाच नाव उज्वल करण्याचं स्वप्नं कित्येकांनी शालेय जीवनात रंगवलेलं असतं. पण सर्वांनाच त्यासाठीची संधी किंवा योग्य मार्गदर्शन मिळतंच असं नाही. विशेषतः ग्रामीण भागातील मुलं या सोयी सुविधांपासून वंचित राहतात. तर अशा मुलांचं, तरुणांचं स्वप्नं पूर्ण करण्यासाठी आणि योग्य वयात त्यांना खेळाविषयक योग्य मार्गदर्शन मिळावं या उद्देशाने TWJ - द सोशल रिफॉर्मर्स क्रीडा क्षेत्रात कार्यरत आहे. सध्या क्रिकेट आणि तिरंदाजी या दोन क्रीडाप्रकारात संस्थेचे संघ असून सातत्याने उत्तम प्रदर्शन करत आहेत.

## 1. क्रिकेट

TWJ DOMINATORS

क्रिकेट क्षेत्रात महाराष्ट्राचं मोलाचं योगदान आहे. अनेक नावाजलेले क्रिकेटपटू या मातीत घडले. यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन या क्षेत्रात पदार्पण करू पाहणाऱ्या ग्रामीण भागातील खेळाडूंना योग्य सोयी सुविधा तसेच योग्य प्रशिक्षण देऊन स्पर्धांच्या माध्यमातून योग्य संधी निर्माण करून देण्याचे कार्य या विभागाद्वारे केले जाते. सध्या व्यवस्थापक श्री. स्वप्नील नार्वेकर, त्याचबरोबर प्रशिक्षक श्री. निनाद करंगुटकर यांच्या मार्गदर्नाखाली १५ उत्तम खेळाडू उल्लेखनीय कामगिरी करीत आहेत. कर्णधार प्रथमेश वेद्रे या संघाचे नेतृत्व करत आहेत.



| | |
|---|---|
| ३१ जुलै पर्यंत  सहभाग नोंदवलेल्या एकूण स्पर्धा | ४८ |
| प्रथम क्रमांक | ८ |
| द्वितीय क्रमांक | १० |
| तृतीय क्रमांक | ५ |



**श्री. स्वप्नील नार्वेकर**
व्यवस्थापक, क्रिकेट संघ



**ओव्हर आर्म टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा, सावर्डे**



**फ्रेंडशिप ट्रॉफी, चिपळूण**

# 2. तिरंदाजी

आपल्या पारंपरिक क्रीडा प्रकारांपैकी एक आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजलेला पण तरीही ग्रामीण भागात थोडा दुर्लक्षित असा खेळ म्हणजे तिरंदाजी किंवा धनुर्विद्या. या क्रीडा प्रकाराचे पुनरुज्जीवन व्हावे त्याचबरोबर खेड्या-पाड्यातील मुलामुलींना या खेळाचे योग्य प्रशिक्षण मिळावे आणि विविध स्तरावरील स्पर्धांसाठीचे मार्ग त्यांच्यासाठी खुले व्हावेत या उद्देशाने TWJ - द सोशल रिफॉर्म्स ने तिरंदाजी विभागाची सुरुवात केली.

या विभागा अंतर्गत भारतीय महिला आशियाई कप तिरंदाजी संघाचे प्रशिक्षक श्री. ओंकार घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली येरवडा, पुणे येथे 'आर्चरी अकॅडमी' उभारण्यात आली आहे. सध्या या अकॅडमीतील विद्यार्थी राज्यस्तरीय, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करीत आहेत. संस्थेच्या या विभागाद्वारे ग्रामीण भागातील शाळांमध्ये प्रात्यक्षिक आणि प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन केले जाते. दि. १ जुलै २०२२ रोजी गुहागर तालुक्यातील पालशेत येथे धनुर्विद्या प्रशिक्षण केंद्र सुरू झाले.

| | |
|---|---|
| एकूण खेळाडूंची संख्या | ८ |
| सहभाग घेतलेल्या राज्यस्तरिय स्पर्धा | ६ |
| सुवर्ण | १२ |
| रौप्य | ४ |
| कांस्य | ३ |
| सहभाग घेतलेल्या राष्ट्रस्तरिय स्पर्धा | ५ |
| सुवर्ण | ७ |
| रौप्य | ३ |
| कांस्य | ४ |



**श्री. ओंकार घाडगे**
व्यवस्थापक, आर्चरी अकॅडमी






# आरोग्य




**डॉ. श्रद्धा जाधव,**
प्रमुख, आरोग्य विभाग

आरोग्य ही मानवाची मूलभूत गरज आहे. पण आजही दुर्गम भागात आरोग्य सेवा आवश्यक तितकी मिळत नाही. अशा दुर्गम भागातील नागरिकांना आरोग्याची सेवा उपलब्ध व्हावी हे मुख्य उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून आरोग्य विभाग काम करित आहे. कोरोनाच्या पहिल्या लाटेपासूनच आरोग्य विभाग भरीव कार्य करित आहे.

आरोग्य विभागाद्वारे, विभागप्रमुख डॉ. श्रद्धा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली नियमितपणे परिसरातील विद्यार्थी आणि वृद्धांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जाते. मतीमंद, गतीमंद, दिव्यांग व्यक्ती आपल्या आजाराबाबतीत स्पष्ट सांगू शकत नाहीत. आरोग्य विभागाद्वारे अशा व्यक्तींची त्याच्या वसतिगृहात जाऊन आरोग्य तपासणी केली जाते. आरोग्य विभागाद्वारे मासिक रक्तदान शिबीराचेही आयोजन केले जाते.

आरोग्य विभाग अवयव दान या विषयातही जनजागृतीसाठी काम करत आहे. त्यासाठी मोहन फॉउंडेशन, चेन्नई या प्रथितयश संस्थेसोबत विभागाने कार्यास सुरुवात केली आहे.

| | |
|---|---|
| ३० जुलै २०२२ पर्यंत एकूण पर्यंत एकूण आरोग्य शिबीर व उपक्रम | ७४ |
| लाभार्थी | ४१२० |



**डॉ. गजानन जोगळेकर**
डॉक्टर, TWJ क्लिनिक






# संशोधन

कोणत्याही समस्येचे मूळ शोधून काढल्याशिवाय त्या समस्येचं निराकरण शक्यच नाही. त्यामुळेच सामाजिक प्रश्नांचा सर्व बाजूंनी सखोल आणि शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करून त्या प्रश्नांवर योग्य तोडगा शोधून काढणारा संस्थेचा विभाग म्हणजे संशोधन विभाग (The Incubation Centre). या विभागामार्फत समाजाला भेडसावत असलेल्या कोणत्याही सामाजिक विषयातील संशोधनासाठी प्रशिक्षणार्थी संशोधकांना मार्गदर्शन आणि आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

संशोधन केंद्रामध्ये संस्थेचे संचालक श्री. प्रसन्न करंदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक सामाजिक विषयांवर संशोधन केले जाते. २०२१ या प्रथम वर्षातच The Incubation Centre च्या दोन बॅच पूर्ण झाल्या. त्यातील प्रशिक्षणार्थी संशोधक सध्या कृषी व शिक्षण या विषयात प्रत्यक्ष लोकांमध्ये जाऊन यशस्वीपणे कार्यरत आहेत.



# शिक्षण

ग्रामीण भागातील तसेच सोयीसुविधांपासून वंचित असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी TWJ-TSR सुरुवातीपासूनच प्राधान्याने काम करीत आहे. हे कार्य रचनात्मक पद्धतीने करण्यासाठी अनेक प्रकल्पांची सुरुवात करण्यात आली आहे. त्यापैकी एक महत्वाचा प्रकल्प म्हणजे 'माझी शाळा' होय. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेच्या माध्यमातून आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करणारा हा प्रकल्प आहे. हा प्रकल्प ५ टप्प्यांचा आहे. प्रत्येक टप्प्यात चढत्या क्रमाने शाळेला शैक्षणिक साहित्य, पाठयपुस्तके, ग्रंथ, तज्ञांचे मार्गदर्शन, कार्यशाळा, प्रशिक्षण, परिसंवाद, शिक्षक, बैठकव्यवस्था, इमारत, स्कूल बस, अशा आणि इतर आवश्यक गोष्टी उपलब्ध करून दिल्या जातात.

या प्रकल्पांतर्गत पहिली शाळा म्हणून गतवर्षी 'श्रीरामवरदायिनी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, निरबाडे' या विद्यालयाची निवड करण्यात आली. या विद्यालयात पहिल्या वर्षी पार पडलेल्या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत फार सकारात्मक बदल पहायला मिळत आहे. याच प्रकल्पाचा भाग म्हणून निर्भय नारी शक्ती फाउंडेशनच्या संस्थापिका प्रभशरण कौर यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थिनींना स्वसंरक्षण प्रशिक्षण देण्यात आले.





# नाट्य

कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी जशी प्रचंड मेहनत गरजेची असते तेवढीच गरज योग्य वयात योग्य मार्गदर्शन मिळण्याची असते. त्यामुळेच अगदी लहान वयापासून विद्यार्थ्यांनी आपल्यातील अभिनय कौशल्य ओळखून, योग्य मार्गदर्शनाने अभिनय क्षेत्रात त्यांनी आपली यशस्वी कारकीर्द घडवावी या उद्देशाने संस्थेच्या नाट्य विभागाची स्थापना करण्यात आली.

नाट्य अभिनेते श्री. मंथन खांडके यांच्या मार्गर्शनाखाली हा विभाग कार्यरत आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील प्रत्येकी एका शाळेत अभिनय प्रशिक्षणाची कार्यशाळा घेऊन त्यातून अभिनय कौशल्य असणारी मुलं निवडून त्यांना वर्षभर मोफत प्रशिक्षण देणं असं या प्रकल्पाचं स्वरूप आहे. आतापर्यंत खेड, चिपळूण, दापोली, गुहागर, रत्नागिरी, राजापूर इ. तालुक्यातील शाळांमध्ये अभिनयाचे प्रशिक्षण देण्यात आले. या सर्व कार्यशाळांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ४२ विद्यार्थ्यांची पुढील प्रशिक्षणासाठी निवड झाली असून त्यांचे अभिनय कौशल्य विकसित करण्यासाठी त्यांना पुढे प्रशिक्षण देण्यात येत आहे.



**श्री. मंथन खांडके**
व्यवस्थापक, नाट्य विभाग









# कला आरंभ

माणूस हा कलासक्त प्राणी आहे आणि अशा कलासक्त माणसांना सर्वाधिक सुखावणारी कला म्हणजे चित्रकला. प्राचीन काळापासून या कलेला सामाजिक जीवनात विशेष स्थान आहे. या कलेच्या जोपासनेसाठी त्याचबरोबर या कलेत पारंगत होऊन या क्षेत्रात आपले योगदान देण्यासाठी उत्सुक असलेल्या कलाप्रेमींना प्रोत्साहन, प्रशिक्षण आणि आर्थिक पाठबळ मिळावं या उद्देशाने 'कला आरंभ' या कला विभागाची निर्मिती करण्यात आली.


आजच्या घडीला या विभागात ६ उत्तम चित्रकार असून विविध प्रकारच्या चित्रकृतींच्या माध्यमातून ते कलाविष्कार घडवत असतात. या चित्रकारांनी १०० हून अधिक उत्कृष्ट चित्राकृती रेखाटल्या आहेत. कला आरंभ तर्फे विद्यार्थी, शिक्षक तसेच पालकांसाठी चित्रकला मार्गदर्शन कार्यशाळांचे तसेच प्रदर्शनांचे आयोजन केले जाते. या कला प्रदर्शनांना नेहमीच कलाप्रेमींचा उत्तम प्रतिसाद लाभतो आणि कलाकारांना कौतुकाची थापही मिळते.

कला आरंभ



**श्री. सर्वेश दाभोळकर**
समन्वयक, कला आरंभ





# कृषी

वाढत चाललेली लोकसंख्या आणि त्याच पटीत वाढत जाणारी अन्न पुरवठ्याची मागणी याचा विचार करता कृषी क्षेत्राशी निगडीत असलेल्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेऊन त्यावर संशोधन आवश्यक आहे. शेतीमालाचा कमी दर आणि अल्प भूधारणा हे आपल्या शेतकऱ्यांसमोरील महत्वाचे प्रश्न आहेत. या प्रश्नांवर अनुक्रमे करार शेती आणि बहुस्तरीय-मिश्र शेती हे उत्तम उपाय ठरू शकतात हे जाणून कृषी विभागातील प्रशिक्षणार्थी संशोधक वृषभ मांडवे याने करार शेती या प्रकल्पास सुरुवात केली. करार शेतीबद्दल शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि हमीभावाने कृषी माल मोठ्या प्रमाणावर घेणाऱ्या कंपन्यांना प्रत्यक्ष भेटून शेतकरी - कंपनी करार करणे असे या प्रकल्पाचे स्वरूप आहे.

बहुस्तरीय-मिश्र शेती या प्रकल्पामध्ये अल्प भूधारक शेतकऱ्यांना वर्षभर आर्थिक उत्पन्नाचा स्रोत निर्माण व्हावा यासाठी बहुस्तरीय-मिश्र शेती चे वेगवेगळे मॉडेल्स तयार करण्यात आले आहेत. हे मॉडेल यावर्षी प्रायोगिक तत्त्वावर आणि तेही सेंद्रिय पद्धतीने, सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील कुमठे या गावात एका एकरावर यशस्वीपणे राबविण्यात आले आहेत. पुढील टप्प्यात अधीक कृषिक्षेत्रावर हे मॉडेल राबविण्यात येणार आहे.



**श्री. शैलेंद्र चौघुले**
व्यवस्थापक, कृषी विभाग



**श्री. वृषभ मांडवे,**
प्रकल्प व्यवस्थापक, कृषी विभाग

या प्रकल्पाची माहिती मिळाल्यावर श्री. सत्यजीत भटकळ सर (C.E.O पाणी फाउंडेशन) आणि डॉ. अविनाश पोळ सर (प्रमुख मार्गदर्शक, पाणी फाउंडेशन) यासारख्या तज्ञ मंडळींनी प्रकल्पाला प्रत्यक्ष भेट दिली आणि भविष्यात या प्रकल्पावर एकत्र काम करण्यास उत्सुकताही दर्शवली.

कृषी विभाग हायड्रोपोनिक्स (Hydroponics) मध्येही काम करित आहे. हायड्रोपोनिक्स म्हणजे मातीचा उपयोग न करता झाडांना आवश्यक असलेली पोषक तत्वे पाण्याच्या साहाय्याने देऊन शेती करणे. या पद्धतीने अत्यल्प जागेत आपली दैनंदिन भाजीपाल्याची गरज भागेल इतकं भाजीपाल्यांचं उत्पादन घेता येते. कोकणातील आर्द्र हवामानात भाजीपाल्यांची उत्तम वाढ कशी करता येईल यासाठी चिपळूण येथे प्रायोगिक तत्वावर हा प्रकल्प सुरू आहे.





दर्जेदार मराठी साहित्य सर्वसामान्य लोकांपर्यंत तेही सवलतीच्या दरात पोहोचविण्याचा अभिनव उपक्रम म्हणजे 'भावार्थ' होय. दिनांक १५ ऑगस्ट २०२१ रोजी सुप्रसिद्ध अभिनेते आणि वक्ते श्री. शरदजी पोंक्षे यांच्या हस्ते भावार्थचे उद्घाटन झाले. भावार्थ मध्ये वाचक कोणतेही पुस्तक कितीही वेळ विनामूल्य वाचू शकतो. सर्व प्रकारातील दर्जेदार मराठी पुस्तकांचे वातानुकुलित पुस्तकालय, सुमधूर संगीत आणि कॉफीसह वाचनानंद, भावार्थचे खास टी-शर्ट व मग आणि चित्रकलेच्या सर्व साहित्याची उपलब्धता ही भावार्थची वैशिष्ट्ये म्हणता येतील. मराठी साहित्य अगदी ग्रामीण भागापर्यंत पोहोचावे यासाठी भावार्थच्या माध्यमातून शाळा, कॉलेज, सार्वजनिक उत्सव-समारंभ अशा ठिकाणी सातत्याने ग्रंथ प्रदर्शनांचे आयोजनही केले जाते.



**श्री. ओंकार धनावडे**
व्यवस्थापक, भावार्थ व्हॅन



**श्री. विवेक कदम**
व्यवस्थापक, भावार्थ चिपळूण



**कीर्ती जोशी**
व्यवस्थापक, भावार्थ पुणे

भावार्थचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे **भावार्थ मैफल**. भावार्थ मैफल म्हणजे साहित्य - सांस्कृतिक क्षेत्रातील सुप्रसिद्ध व्यक्तींच्या जाहीर कार्यक्रमांचे आणि प्रकट मुलाखतींचे आयोजन! चिपळूणमध्ये आजवर अशा चार भव्य मैफलींचे आयोजन करण्यात आले असून या सर्व मैफलींना चिपळूणकर रसिकांचा भरभरून प्रतिसाद लाभला.

भावार्थची नवीन शाखा दि. १४ जून २०२२ रोजी कोथरूड, पुणे येथे सुरू झाली. प्रसिद्ध अभिनेते श्री. जितेंद्र जोशी यांच्या हस्ते या शाखेचे उद्‌घाटन झाले. येथे **शब्दयात्री** सारख्या कार्यक्रमातून दर महिन्याला वेगवेगळे साहित्यिक रसिकांच्या भेटीला येत असतात. तसेच **शब्दमंच** या कार्यक्रमाद्वारे नवीन लेखक व कवींसाठी भावार्थतर्फे एक मंच उपलब्ध करण्यात आला आहे. या बरोबरच खेळविषयी गप्पा **Cricकट्टा** च्या माध्यमातून येथे रंगतात.










# देवराई

विरळ होत असलेली वनराई आणि बेसुमार वृक्षतोड यावर उपाय म्हणजे मोठ्या प्रमाणावर वृक्षांची लागवड आणि त्यांचे संवर्धन करणे होय. या दृष्टीने काम करण्यासाठी TWJ- द सोशल रिफॉर्म्स आणि वृक्षवल्ली रोपवाटिका, पाटगाव, संगमेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने देवराई हा प्रकल्प सुरू करण्यात आला. या प्रकल्पाचा शुभारंभ दि. ७ डिसेंबर २०२१ रोजी मा. आ. श्री. शेखरजी निकम, रत्नागिरी जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. इंदुराणी जाखड, इ. मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. कमी पाण्यावर जगणाऱ्या वड, पिंपळ, साग, इ.  सारख्या २० प्रकारच्या जंगली झाडांची पुरेशी वाढ झालेली रोपे तयार करणे आणि त्यांचे गरजेच्या ठिकाणी रोपण करण्यासाठी मोफत रोपे उपलब्ध करून देणे असे या प्रकल्पाचे स्वरूप आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात सुमारे ५० हजार रोपे मोफत वितरित करण्याचे काम १० मे २०२२ पासून सुरू करण्यात आले.



**श्री. हेमंत तांबे**
सल्लागार व्यवस्थापक
वृक्षवल्ली रोपवाटिका







# नृत्य

पुणे येथे अनुभवी कोरिओग्राफर श्री. प्रफुल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली नृत्य विभागाची सुरुवात 'Just Moves' या नृत्य अकादमी झाली आणि आता विविध नृत्य प्रकारांचे उत्तम प्रशिक्षण देणाऱ्या केंद्रांची शृंखला सुरू करण्याच्या दिशेने विभागाची वाटचाल सुरू आहे. 'Just Moves' मध्ये नृत्याचे व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग घेतले जातात आणि त्याबरोबरच कार्यशाळांमधून निवडलेल्या विद्यार्थ्यांना नृत्य प्रशिक्षणही दिले जाते. अगदी सुरुवातीपासूनच 'Just Moves' नृत्य अकादमीला पुणेकरांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे.



**श्री. प्रफुल मोरे**
मुख्य मार्गदर्शक/कोरिओग्राफर,
जस्ट मूव्ह



# जनसंपर्क

समाजातील प्रत्येक माणूस हा आमच्या संस्थेचा केंद्रबिंदू असून प्रत्येक वंचितापर्यंत पोहोचणे हा संस्थेचा मुख्य उद्देश सफल व्हावा यासाठी जनसंपर्क (Outreach) विभाग प्रस्थापित करण्यात आला. सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या विविध संस्था, सामाजिक कार्यकर्ते आणि शासकीय यंत्रणा या सर्वांना सोबत घेऊन तळागाळातील प्रत्येक गरजू लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी हा विभाग कार्यरत आहे.

विभागाने २०२२ या वर्षाच्या सरूवातीपासूनच जल व्यवस्थापनासाठी नाम फाऊंडेशन सोबत काम सुरू केले. याचप्रमाणे आरोग्य, शिक्षण, अनाथ व मतिमंदांचे संगोपन, शेती, बचतगट, इ. विषयांवर काम करणाऱ्या अनेक संस्थांसोबत देखील कार्याला सुरूवात झाली आहे. अनेक सामाजिक कार्यकर्तेसुद्धा TWJ - द सोशल रिफॉर्म्ससोबत जोडले गेले आहेत. त्यापैकी जलमित्र शहानवाज शहा आणि शंकर कदम यांच्या सहकार्याने श्रमदानातून ६ वनराई बंधारे बांधण्यात आले आहेत.



**श्री. प्रथमेश पोमेंडकर**
समन्वयक, जनसंपर्क



# पाणी व्यवस्थापन

कोकणात पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे पुर येणे आणि पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन न झाल्यामुळे एप्रिल - मे महिन्यात पाणी टंचाई होणे या समस्यांना तोंड द्यावे लागते. चिपळूण शहरातील शिवनदी आणि वाशिष्ठी नदी गाळाने भरल्यामुळे चिपळूण शहराला पुराच्या संकटाला सामोरे जावे लागते. नाम फाऊंडेशन सोबत TWJ - द सोशल रिफॉर्म्सने चिपळूण शिवनदी गाळ उपसा व नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांतर्गत शिवनदी गाळ मुक्त करण्याचे कार्य हाती घेतले.
वनराई बंधाऱ्यांमुळे नदीचे पाणी अडवून साठवले जाते आणि त्याचा उपयोग उन्हाळ्यात शेती, पिण्यासाठी आणि इतर दैंन पाणी साठवण क्षमता असलेला वनराई बंधारा बांधला. तर दि. १२ फेब्रुवारी २०२२ रोजी वारेली येथे ४ बंधारे बांधले. TWJ - द सोशल रिफॉर्म्सने या बंधाऱ्यांसाठी आवश्यक साहित्य देऊन श्रमदान देखील केले.

खेड तालुक्यातील कळंबणी मधील जगबुडी नदीचा प्रवाह बदलत असल्याने पावसाळ्यात या नदीचे पाणी नदीकाठी असलेल्या शेतजमिनीमध्ये जाऊन तिथली सुपीक माती वाहून जात आहे. या शेतजमिनी नापीक होण्यापासून वाचवण्यासाठी संस्थेमार्फत या नदीचा प्रवाह पूर्ववत व्हावा यासाठी काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे.





# 'द टॉकिंग फ्रेम्स' आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

रत्नागिरी सारख्या कलेची कदर असणाऱ्या शहरात चित्रपट रसास्वादाची परंपरा सुरू करावी, नाटक आणि संगीताबरोबरच चित्रपटासाठी सुद्धा चोखंदळ प्रेक्षकवर्ग निर्माण व्हावा या हेतूने TWJ - द सोशल रिफॉर्म्स आणि प्रभात चित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'द टॉकिंग फ्रेम्स' आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन रत्नागिरी येथील गोगटे जोगळेकर महाविद्यालयात करण्यात आले. २० मे ते २२ मे २०२२ दरम्यान आयोजित या तीन दिवसीय महोत्सवाला रत्नागिरीतील चित्रपट प्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या चित्रपट महोत्सवाच्या निमित्ताने आंतरराष्ट्रीय लघुपट स्पर्धेचे आयोजन देखील करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी जगभरातून तसेच भारताच्या वेगवेगळ्या प्रादेशिक भाषांमधील लघुपट सहभागी झाले. त्यातील निवडक २० चित्रपटांचा या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात समावेश करण्यात आला. या चित्रपट महोत्सवाला सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक निखिल कोवळे, दिग्दर्शक प्रकाश कुंटे, निर्माते दिग्दर्शक अनिरुद्ध सिंग यांची विशेष उपस्थिती लाभली. क्युरेटर व क्रिएटिव हेड संतोष पाठारे आणि क्रिएटिव डायरेक्टर शोनील येल्लातीकर यांच्या मार्गदर्शनाखाली या चित्रपट महोत्सवाचे तसेच आंतरराष्ट्रीय लघुपट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.






# मानसिक रुग्ण सेवा

मानसिक रुग्ण व्यक्ती समाजाचा भाग असूनही दुर्लक्षित असते. त्यांच्या मानसिक स्थितीमुळे काहीवेळा अशी माणसं समाजासाठी उपद्रवी ठरतात. पर्यायाने अशा रुग्णांना समाज स्वीकारत नाही. संस्थेच्या आरोग्य विभागाद्वारे अशा मानसिक रुग्णांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न केले जातात. श्री. सुमंत ठाकरे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने समाजाने वाळीत टाकलेल्या अनेक मानसिक रुग्णांचे पुनर्वसन करण्यात यश मिळवले आहे. मानसिक रुग्ण केवळ मनोरुग्णालयात दाखल करून संस्थेची जबाबदारी संपली असे आम्ही मानत नाही. रस्त्यावर आढळलेल्या या मानसिक रुग्णांच्या कुटुंबाचा शोध घेऊन त्यांना सुखरूप त्यांच्या पर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न असतो. एखाद्या निराधार किंवा कुटुंबीयांनी स्वीकार करण्यास नकार दिलेल्या मानसिक रुग्णांचे पुनर्वसनही निराधारांची सेवा करणाऱ्या संस्थेमध्ये केले जाते.

त्याचबरोबर कुटुंबियांसोबत राहणाऱ्या मानसिक रुग्णांना उपचारासाठी प्रादेशिक मनोरुग्णालय, रत्नागिरी येथे दाखल करण्याबाबत त्यांचे नातेवाईक उदासीन असल्याचे आढळून येते. अशा कुटुंबांना संस्थेमार्फत मार्गदर्शन केले जाते. त्यानंतर ते स्वतः या मानसिक रुग्णांना पुढील उपचारांसाठी दाखल करतात. समाजापासून तुटलेल्या, स्वतःच्याच जगात गुरफटलेल्या या असहाय्य जीवांना पूर्ववत आयुष्य जगताना पाहण्यात एक वेगळंच समाधान आम्ही अनुभवत आहोत.

| | |
|---|---|
| संस्थेतर्फे उपचारासाठी दाखल करण्यात आलेले एकूण मानसिक रुग्ण | १३ |
| रस्त्यावर भटकत असलेले मानसिक रुग्ण | ०७ |
| कौटुंबिक मानसिक रुग्ण | ०४ |
| निराधार व्यक्ति | ०२ |
| पुनर्वसन झालेले ( पुरुष ४ आणि महिला ३ ) | ०७ |



**श्री. सुमंत ठाकरे**
व्यवस्थापक कार्यकारी

TWJ
TradeWithJazz
TRADE | TRAVEL | TRANSFORM

TWJ Foundation
THE SOCIAL REFORMS

The Social Reforms Office,
Shop No.14, Near Domino's Pizza, CRD Prime, Pagmala, Chiplun - 415605

+ 91 9793097934

www.thesocialreforms.org

contactus@thesocialreforms.org